http://www.epitomejournals.com Vol. 2, Issue 12, December 2016, ISSN: 2395-6968

Epitome Journals
International Journal of Multidisciplinary Research
ISSN : 2395-6968 | Impact Factor = 3.656

# ग्रामसभा : लोकशाही सक्षमीकरणाचे एक माध्यम



**प्रा. भालेराव संजय किशनराव**

लोकप्रशासन विभागप्रमुख

शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान

महाविद्यालय, कन्नड जि. औरंगाबाद

ई–मेल : sanjaybhalerao1979@gmail.com

## Abstract

'सच्चा लोकतंत्र वही है जो निचले स्तर पर लोंगो की भागीदारी पर आधारीत हो. यह तभी संभव है जब गांव मे रहने वाले आम आदमी को भी शासन के बारे में फैंसला करने का अधिकार मिले.' (कुमारी, 2014) 'आमची खेडी भारता इतकीच जूनी आहेत.' (गांधी, 2011) असे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी म्हटले होते. या खेड्या इतकीच प्राचीन आमची ग्रामपंचायत व ग्रामसभा आहे. कारण गावाचा कारभार पाहणारी 'ग्रामपंचायत' ही लोकायत संस्था होती तर स्वयंपूर्ण शासन व्यवस्था म्हणून 'ग्रामसभा' होती. या काळात ही गावक–यांची भौतिक, नैतिक, आर्थिक व धार्मिक उन्नती करण्याचे अधिकार गावक–यांनी ग्रामसभेला दिल्याचे दिसून येते. थोडक्यात, ग्रामसभेच्या स्वरूप व कार्यात व्यापकता येत गेली. 'रक्ताचा एक थेंब न सांडता झालेले परिवर्तन म्हणजे लोकशाही.' असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले होते. याप्रमाणे दुस–या महायुध्दानंतर जागतिक स्तरावरील बहुतांश राष्ट्रांनी लोकशाही शासन व्यवस्थेचा पुरस्कार केला व भारताने 15 ऑगस्ट 1947 मध्ये तिचा स्विकार केला.

**Keywords :** लोकशाही, भारत, ग्रामपंचायत, ग्रामसभा, भारत, शासन

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR, All rights reserved.

## Research Paper

लोकशाही अधिक बळकट व साकार व्हावी हे महात्मा गांधी यांचे ग्रामस्वराज्यांचे स्वप्न साकार व्हावे यासाठी 02 ऑक्टोबर 1959 रोजी पंचायत राज व्यवस्थेचा प्रारंभ करून लोकशाही विकेंद्रीकरणाचे तत्व अंमलात आणण्यास सुरूवात झाले. पंचायतराज व्यवस्थेला गतीशील व प्रभावशील करण्यासाठी 24 एप्रिल 1993 रोजी ग्रामपंचायत व ग्रामसभेस घटनात्मक दर्जा दिला.

24 एप्रिल 1993 च्या 73 व्या घटनादुरूस्तीन्वये ग्रामसभेची खरी ओळख नागरिकांना पटण्यास सुरवात झाली. कारण ग्रामसभा ग्रामविकासाच्या गंगोत्री म्हणून अस्तित्वात येत होती. या ग्रामसभेस घटनात्मक दर्जा बहाल करून दोन दशके पूर्ण झाली आहेत. या अनुषंगाने या शोधनिबंधाचा अभ्यास विषय ग्रामसभेचा संक्षिप्त ऐतिहासिक आढावा घेणे, ग्रामसभा वर्षाची पार्श्वभूमी समजावून घेणे, ग्रामसभा यशस्वी न होण्यामागची कारणे व ती यशस्वी होण्यासाठी उपाय सुचविणे या पुरता मर्यादीत आहे.

### ग्रामसभेचा विकास :

ग्रामसभेचा विकास मानवी जीवनाच्या विकासाबरोबर विकसित होत राहीला. ग्रामसभा ही ग्रामपंचायत क्षेत्रातील सर्व मतदाराची आमसभा आहे व आपल्या क्षेत्राचा चेहरा–मोहरा बदलण्याची क्षमता असलेले एक सशक्त व्यासपीठ आहे. यांच्या विकासाचा आढावा खालीलप्रमाणे.

### 1) ग्रामसभा व प्राचीन कालखंड :

प्राचीन कालखंडात जगभरात राजेशाही व्यवस्था अस्तित्वात होती. भारतात ऋग्वेदीक कालखंडात राजाचे पद नैतिकतेने सर्वसंपन्न होत. कारण राजाची जनतेव्दारे निवड झाल्यानंतर जनतेच्या हिताची शपथ तो घेत असे. वैदिक कालखंडातील वेद, मनुस्मृती, रामायण, महाभारत, मेगेस्थेनीज यांचा 'इंडिका', कौटिल्याचे अर्थशास्त्र इ. साहित्यामध्ये शासन स्तरावर सभा व समिती या दोन संस्थाचे वर्णन आढळते. (कटारिया, 2011.) गावातील संपूर्ण जनतेच्या सामूहिक स्वरूपास समिती व तिच्या संचालन संस्थेस सभा असे संबोधण्यात येत असे. (सिंह, 2014,)

थोडक्यात, सभा असो अथवा समिती परंतु भारतात गावपातळीवर सामूहिक निर्णय घेण्याची परंपरा होती असे आढळून येते.

### 2) ग्रामसभा व स्वातंत्र्यपूर्व कालखंड :

भारतात ग्रामविकासाची कामे स्वयंस्फूर्त व जनसहभागातून केली जात. त्यामुळे गावे समृध्द आणि स्वयंपूर्ण होते : या आधारावरच इंग्लंडमधील पार्लमेंटच्या हाऊस ऑफ कॉमन्स, मध्ये 1832 मध्ये बोलतानां चार्ल्स् मेटकॉफ यांनी भारतातील खेड्यांचा उल्लेख, लिट्ल रिपब्लिक्स (छोटी गणराज्ये) असा केला होता. (गोडबोले, 2014) या कल्पनेनुसार खेडे स्वयंपूर्ण असून, त्यांचा कारभार पंचायत जबाबदारीने पाहत असत.

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR, All rights reserved.

लॉर्ड रिपन यांनी स्थानिक स्वराज्य संस्थेस चालना देण्यासाठी 18 मे 1882 रोजी जाणीवपुर्वक ठराव पारीत केल्यामुळे त्यांना स्थानिक स्वराज्य संस्थेचे जनक म्हणून संबोधण्यात येते. (तळवलकर, 2011) पुढे 1919 व 1935 च्या कायद्यात स्थानिक स्वराज्य संस्थेचा विचार आढळून येतो.

या दरम्यान भारतात स्वातंत्र्य चळवळीने जोम धरला होता. लोकमान्य टिळकांनी 'स्वराज्याचा' मंत्र दिला व महात्मा गांधीने असहकाराचे तंत्र दिले. या दोन्हीतून ग्रामस्वराज्य आकारास आले. (विनोबा, 2011). पुढे 15 ऑगस्ट 1947 रोजी भारतात स्वातंत्र्य मिळाले.

### 3) ग्रामसभा व स्वातंत्र्योत्तर कालखंड :

महात्मा गांधी यांचे ग्रामस्वराज्य स्वप्न साकार करण्याची आग्रही भूमिका पंडित जवाहरलाल नेहरूची होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना ही बाब पसंत नव्हती आणि घटना समितीमध्ये त्यावर टिका करताना म्हटले, की गणराज्ये देशाच्या –हासास कारणीभूत झाली, कारण खेडे हे स्थानिक राजकारणाचे, अज्ञानाचे, संकुचित दृष्टिकोनाचे आणि जातीयवादाचे केंद्र झाले. (गोडबोले, 2014) आज त्याची प्रचीती येताना दिसते.

शेवटी भारतीय राज्यघटनेच्या भाग चार, राज्यधोरणाची मार्गदर्शक तत्वाच्या कलम 40 मध्ये ग्रामपंचायत स्थापनेची तरतूद करण्यात आली. (भारताचे संविधान, 2001) बलवंतराय मेहता समितीच्या त्रिस्तरीय लोकशाही विकेंद्रीकरणाच्या शिफारशी नूसार, म.गांधी जयंतीचे औचित्य साधून पं. जवाहरलाल नेहरू यांनी 02 ऑक्टोबर 1959 रोजी राजस्थान मधील नागौर यागावी पंचायतराज व्यवस्थेचा प्रारंभ करून त्यास ऐतिहासिक महत्व प्राप्त करून दिले. (सांभरिया, 2010) पंचायतराज व्यवस्थेस अधिक सक्षम बनविण्यात बलवंतराय मेहता समिती (1957), अशोक मेहता समिती (1977), जी.के.व्ही. समिती (1998), एल.एम.संघवी समिती, थंगून समिती, नाथूराम मिर्धा समिती (1991) इ. समितीचे योगदान अमूल्य राहिले आहे.

पंचायत राज व्यवस्थेची गेल्या चार दशकापासून होणारी वाटचाल लक्षात घेऊन श्री राजीव गांधी यांनी 15 मे 1989 रोजी असे म्हटले होते, भारतवासियों के लिए हमे अधिकतम जनतंत्र और अधिकार सुनिश्चित करने होगें. सत्ता मे दलालो का अंत होना, हमे आम लोंगों को शक्तिया प्रदान करनी होगी. (मैथ्थू, 2011) यावरून पंचायतराज व्यवस्थेत श्री राजीव गांधी यांचा रचनात्मक बदल घडून आणण्याचा मानस लक्षात येतो. 22 व 23 डिसेंबर 1992 रोजी लोकसभा व राज्यसभेत 73 व्या व 74 घटनादुरूस्ती करून श्री. राजीव गांधींनी वरील मानस पुर्ण केला. या ऐतिहासिक निर्णयास, सुप्त सामाजिक क्रांतिची सुरूवात झाली. असे संबोधण्यात आले.

### 4) ग्रामसभा व राज्यघटनेतील तरतूदी :

73 व्या घटनादुस्तीन्वये (1992) संविधानामध्ये भाग 9 जोडण्यात आला. या भागात 16 नवे अनुच्छेद (243–243 ण) पर्यंत आणि अकरावी अनुसूची जोडण्यात आली. यात ग्रामपंचायतीची स्थापना, निवडणूक व कार्य स्पष्ट करण्यात आले. ग्रामसभेविषयी 243(ख) मध्ये, ग्रामसभेचा अर्थ ग्रामपातळीवरील क्षेत्रामध्ये अंर्तभूत

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR, All rights reserved.

असलेल्या एखाद्या गावाशी संबंधीत असलेल्या मतदार यादीत ज्यांची नांवे नोंदविण्यात आली असतील अशा व्यक्तीचा मिळून बनलेला. निकाय किंवा संस्था असा आहे. (भारताचे संविधान, 2002) तर 243(क) मध्ये ग्रामसभा ग्रामपातळीवर राज्याचे विधान मंडळ कायद्याद्वारे तरतूद करील अशा अधिकारांचा वापर करू शकेल अशी कार्य करू शकेल. (भारताचे संविधान, 2002) वरील तरतूदीनूसार ग्रामसभा आपली भुमिका पार पाडते.

**ग्रामसभा वर्ष :**

राष्ट्राच्या सर्वांगिण विकासासाठी व पंचायतीराज्य व्यवस्थेच्या सुवर्ण महोत्सव वर्षानिमित्त 02 ऑक्टोबर 2009 ते 02 ऑक्टोबर 2010 मध्ये संपूर्ण देशात ग्रामसभा वर्ष साजरे करण्यात आले. यामागील उद्देश, ख–या अर्थाने लोकशाही ग्रामस्तरापर्यंत पोहचविणे आहे. या माध्यमातून ग्राम पातळीवरील कारभारामध्ये पारदर्शकता व जनजाग्रती आणणे आहे. यामुळे, ग्रामसभा ही ग्रामीण लोकशाही व्यवस्थापनातील सर्वोच्च यंत्रणा ठरते. (ग्रामविकास विभाग, 2014) या शिवाय जागतिकीकरण ग्लोबल व्हीलेज यूगात पून्हा भारताच्या ग्रामीण विकासावर लक्ष केंद्रित करणे हा आहे.

**1) ग्रामसभेची पार्श्वभूमी :**

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958 च्या कलम (7) नूसार ग्रामपंचायतींना ग्रामसभा घेणे बंधनकारक आहे. या ग्रामसभेत ग्रामपंचायत क्षेत्रातील सर्व स्त्री पुरूष मतदार नागरिकांचा समावेश असेल. ज्यांनी वयाची 18 वर्षे पूर्ण केलेली आहेत. ग्रामसभेच्या या रचनेमुळे ती वास्तव अर्थाने लोकसंस्था बनत चाललेली आहे.

**2) ग्रामसभा आयोजन :**

ग्रामसभा आयोजनाची जबाबदारी सरपंचाची आहे. तर तिच्या अंमलबजावणी करणे ग्रामसेवकावर बंधनकारक आहे. साधारणतः ग्रामसभेच्या दहा दिवस अगोदर नोटीस बजावणे तसेच ग्रामसभेच्या आठ दिवस व एक दिवस अगोदर दोन वेळा प्रत्येक गावात दवंडी देणे आवश्यक आहे. ग्रामसभेच्या नोटीसमध्ये सभेचे स्थळ, वेळ व तारीख यांचा स्पष्ट उल्लेख असावा लागतो. 26 जानेवारी 2003 पासून महिला ग्रामसभा आयोजनास सुरूवात करण्यात आली.

**3) ग्रामसभा संख्या :**

शासनाने प्रत्येक ग्रामीण नागरिक हा ग्रामसभेला उपस्थित राहून त्याला ग्रामसभेचे अधिकार आणि कर्तव्ये अवगत होवून तो ग्राम प्रशासनात व ग्रामविकासाच्या कार्यात सहभागी व्हावा यासाठी शासनाने खालील नमूद केलेल्या कालावधीमध्ये किमान सहा ग्रामसभा घेणे. प्रत्येक ग्रामपंचायतीला बंधनकारक केले आहे. (ग्रामविकास विभाग, 2014)

| अ.क्रं. | दिनांक | दिन |
|---|---|---|
| 01 | 26 जानेवारी | गणतंत्र दिन |
| 02 | 01 मार्च ते 08 मार्च | नागरी संरक्षण दिन ते महिला दिन |

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR, All rights reserved.

| | | |
|---|---|---|
| 03 | 24 एप्रिल ते 01 मे | पंचायत राज दिवस ते महाराष्ट्र दिन |
| 04 | 01 जुलै ते 11 जुलै | कृषी दिन ते लोकसंख्या दिन |
| 05 | 09 ऑगस्ट ते 15 ऑगस्ट | क्रांती दिन ते स्वातंत्र्य दिन |
| 06 | 02 ऑक्टोबर | महात्मा गांधी जयंती |
| 07 | 19 नोव्हेंबर ते 26 नोव्हेंबर | ग्रामस्थ दिन ते जागतिक अन्याय निवारण दिन |

या व्यतिरिक्त ग्रामपंचायत आवश्यकतेनुसार अथवा केंद्र/ राज्य शासनाच्या निर्देशानुसार अधिक ग्रामसभा घेवू शकते.

**4) ग्रामसभेची गणपूर्ती :**

साधारणतः एकूण मतदाराच्या 15 टक्के किंवा 100 यापैकी जी संख्या कमी असेल एवढे मतदार उपस्थित राहिले की गणपूर्ती झाली असे समजण्यात येते. निश्चित केलेल्या वेळेनंतर 30 मिनिटे वाट पाहूनही गणपूर्ती झाली नसल्यास सभा तहकूब केली जाते. याच सभेत पुढची तारीख, वेळ, ठिकाण निश्चित केले जाते.

**ग्रामसभेची कार्ये :**

पंचायतराज्य व्यवस्था अधिक सशक्त बनविण्यासाठी ग्रामसभेस व्यापक अधिकार देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. त्यात प्रामुख्याने अनिवार्य व कायदेशिर कार्ये यांचा समावेश होतो. (खुटवड,1999)

**1) अनिवार्य कार्य :** आर्थिक वर्षातील पहिल्या ग्रामसभेत खालील अनिवार्य विषयाचा समावेश होतो.

- मागील ग्रामसभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.
- मागील वित्तीय वर्षातील जमाखर्चाचे विभागवार (विषय) वाचन करणे व त्या वार्षिक जमाखर्चास मंजूरी देणे.
- मागील लेखापरीक्षण अहवालाचे वाचन करणे आणि त्या अहवालातील शंकांना तसेच पूर्वीच्या अहवालातील शंकाना गतवर्षी दिलेल्या उत्तरांचे वाचन करणे.
- मंजूर अंदाजपत्रकाचे वाचन करणे व त्यानुसार चालू वर्षात घ्यावयाच्या विकास कामांची माहिती देणे.
- चालू वित्तीय वर्षात केलेल्या कामांचा आढावा घेणे व पूढील वर्षात करावयाच्या कामांचा विचार करणे.
- पंचायत समिती, जिल्हा परिषदेची स्थायी समिती, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सुचविलेले विषय घेणे.
- राज्य सरकारने सुचविलेले विषय घेणे.

**2) कायदेशिर कार्य :**ग्रामपंचायतीकडे कायदेशिरपणे सोपविलेले पुढील कामाचे विषय घेणे. त्यात,

- द्रारिद्र्य रेषेखालील कुटुंबाच्या व महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेच्या लाभार्थींच्या यादीला मान्यता देणे.

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR, All rights reserved.

- जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडील सर्व योजनांची माहिती ग्रामसभेत देणे.
- महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेतून घ्यावयाच्या कामांना ग्रामसभेची मंजूरी घेणे.
- दर 3 वर्षांनी ग्रामशिक्षण समितीचे सदस्य निवडणे.
- एकात्मिक ग्रामीण विकास योजनेकरिता दारिद्रय रेषेखालील लाभार्थींची निवड करणे.
- ग्रामविकासाच्या वार्षिक कृती आराखडा वाचून दाखविणे.
- जिल्हा परिषदेच्या आणि पंचायत समितीच्या समाज कल्याण आणि महिला बालकल्याण विभागाकडील योजनांची माहिती देणे.
- ग्रामकृषी विस्तारक आणि कृषी सहाय्यक यांनी तयार केलेल्या गावाचा वार्षिक कृषी आराखडा वाचणे.
- याशिवाय ग्रामपंचायतीच्या गरजेचे इतर विषय घेणे.

थोडक्यात, रत्नकुमार सांभरिया यांनी म्हटल्याप्रमाणे, 'ग्रामसभा ही अशी चावी आहे, जिच्यामुळे ग्रामविकासाचे दार खुले आणि बंद होतात.' वरील ग्रामसभेचे कार्ये, भूमिका सांगितल्यास ग्रामविकासात, ग्रामसमृध्दीत ग्रामसभेचे योगदान किती महत्वपूर्ण आहे हे लक्षात येते.

**ग्रामसभा अयशस्वी होण्यामागची कारणे :**

संतोष कुमार सिंह यांच्यामते, 'ग्रामसभा ही लोकशाही शासनप्रणालीचे हृदय आहे.' (सिंह 2014) असे असून ग्रामसभा मोठ्या प्रमाणात अयशस्वी होतात. त्यामागील कारणे खालील प्रमाणे.

**1) ग्रामसभा आयोजनात अनियमितता व जनसहभागाचा अभाव :** ग्रामसभा आयोजित करण्याबाबत सत्ताधारी पक्षाकडून जाणीवपूर्वक अनियमितता किंवा दिरंगाई केली जाते. समजा ग्रामसभा आयोजनाचे ठरलेच तर गांवकरी कृषी कार्यात मग्न असतील तेव्हा आयोजित केली जाते. या नकारात्मक मानसिकते मुळे गावक—यापर्यंत ग्रामसभेच्या आयोजनाचा वृत्तांत पोहोचत नाही किंवा पोहचविण्यासाठी खास प्रयत्नही केले जात नाहीत. परिणामतः गावक—यांचे ग्रामसभेच्या बैठकीत उपस्थितीचे प्रमाण अत्यल्प तर कधी कोरम पूर्ण होत नाही म्हणून बैठक रद्द करावी लागते. महिलांचा सहभाग नसल्यात जमा असतो.

**2) ग्रामसभेप्रती राजकीय व सामाजिक उदासिनता :** ग्रामपंचायतीमधील भ्रष्टाचार, भाई, भतीजावाद व निष्क्रियता इ. कारणामुळे सरपंच व सदस्य ग्रामसभा बोलविण्यास उदासिन असतात. तर 'सत्ताधारी पक्ष आपल्या मताचा आदर करणार नाही.' अशी विरोधी पक्षाची मानसिकता बनली आहे. त्यामुळे ते ग्रामसभा आयोजनासंबंधी आक्रमक व आग्रही राहत नाही. परिणामतः सत्ताधारी पक्ष मुजोर बनतो.

गावक—यांची काही वेगळी भूमिका नसते. कारण ग्रामीण विकासाच्या कामासंदर्भात कोणतीही कल्पना, माहिती त्यांना नसते. तसेच कृषी कामातील व कोणताही सत्ताधारी पक्ष ग्रामविकासाबरोबर आपला ही विकास करील असा विश्वास गावक—यांना राहिला नाही म्हणून गांवकरी ग्रामसभेविषयी कमालीचे उदासिन आहेत.


Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR, All rights reserved.

**3) ग्रामसभा कामकाजपध्दती विषयी अनभिज्ञता :** कोणत्याही संस्थेचे यशापयश हे तिची कार्ये आणि कार्यपध्दती किती नागरिकांना माहिती आहे. यावर अवलंबून असते. ग्रामसभा यास अपवाद नाही. 24 एप्रिल 1993 मध्ये 73वी घटनादुरूस्ती करून ग्रामसभेस घटनात्मक दर्जा बहाल करण्यात आला. यास दोन दशके पूर्ण होऊन गेली. तरी अद्यापही ग्रामसभेचा सदस्य म्हणून ग्रामसभे प्रती आपले अधिकार व जबाबदारी काय आहे, ग्रामसभेचे अधिकार व कार्ये काय आहेत, ग्रामसभेत कसा प्रस्ताव सादर करावा व त्यास कशी मंजूरी प्राप्त करावी यांची जाणीव नागरिकांना नाही हे वास्तव आहे. अशा परिस्थितीत ग्रामसभा समक्षपणे कशी काम करेल असा प्रश्न उपस्थित होतो.

**4) गट ग्रामपंचायत व ग्रामसभा :** प्रशासकीय व राजकीय गैरसोय टाळण्यासाठी गट ग्रामपंचायतीची स्थापना केली जाते. साधारणतः 08 ते 10 गावांचा समावेश गट ग्रामपंचायती मध्ये असतो. या गट ग्रामपंचायती करीता ग्रामसभेचे आयोजन केले जाते, तेव्हा दूर अंतरावरील गांवातील नागरिकांना दळणवळणाची अपुरे साधने, मजूर व महिला यांना आपल्या उपजिविकेसाठी कामावर (रोजगार) गेल्याशिवाय गत्यंतर नसते. अशा परिस्थितीत ग्रामसभेस उपस्थित राहण्याची इच्छा असून सुध्दा शक्य होत नाही.

**5) ग्रामसभेचा नियंत्रणाचा अभाव :** विनोबा भावे यांनी म्हटले की, ' ग्रामपंचायतीत बहूमताने निर्णय होतात, तर ग्रामसभेत सर्वसंमतीने निर्णय होतात.' (भावे, 2011) यांचा अर्थ ग्रामसभा ग्रामपंचायतीपेक्षा सर्वव्यापक व सर्व समावेशक आहे. कारण ग्रामसभेच्या निर्णयानंतर, मान्यतेनंतर ग्रामपंचायतीने कामाची, योजनांची अंमलबजावणी करणे अपेक्षित आहे. ग्रामपंचायत मात्र याकडे दुर्लक्ष करून स्वइच्छेनूसार कार्य करीत असते. अशा एकांगी भूमिकेमुळे ग्रामसभेस ग्रामपंचायतीवर योग्य नियंत्रण ठेवणे शक्य होत नाही. प्रसंगी ग्रामसभेचे अस्तित्व अशावेळी असून नसल्या सारखे असते.

**6) राजकारण पंचायतराज संस्थेचे :** राजकारण आणि पैसा ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू झाल्या आहेत, कारण 'सत्ता कशासाठी तर पैसासाठी, पैसा कशासाठी तर सत्तेसाठी.' हे राजकीय मूल्य बनले आहे. ग्रामपंचायतीचे सरपंच व सदस्य, पंचायत समिती सभापती व सदस्य, जिल्हा परिषद अध्यक्ष व सदस्य हे कोणत्या तरी राजकीय पक्षांशी बांधिल असतात. आपल्या पक्षाची व आपली सत्ता कायम राहण्यासाठी नेहमी प्रयत्नशील असतात. त्यामुळे निवडणूकीत विजयी होण्यासाठी साम, दाम, दंड आणि भेद याचा मोठ्या प्रमाणात वापर करतात.

परिणामतः गावपातळीवरील राजकारणात व्यक्ती–व्यक्ती, कुटुंबा–कुटुंबात, समूह समूहात मोठ्या प्रमाणात गटबाजी निर्माण झाल्याचे चित्र दिसून येते. या गटबाजीशी प्रत्यक्ष प्रस्थापित सत्ताधारी वर्गाशी निगडीत असलीतरी याचा परिणाम सर्व सामान्य नागरिकांच्या व्यक्तीगत व सार्वत्रिक जीवनावर पडत असतो. त्यामुळे ग्रामसभेपासून चार हात दूर राहील्यास किंवा अलिप्त भूमिका स्वीकारण्यातच आपले हित समजतात.

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR, All rights reserved.

**7) सामाजिक व राजकीय अस्पृश्यता :** सामाजिक अस्पृश्यतेचे दाहक चटके डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अनुभवल्यामुळे तिचे निर्मुलन करण्यासाठी भारतीय राज्यघटनेत मुलभूत हक्कांची तरतूद केली विशेषतः 17 व्या कलमात अस्पृश्यता निवारणांची तरतूद आहे. यामुळे ब–याच प्रमाणात सामाजिक अस्पृश्यता कमी होण्यास मदत झाली. भारतीय राजकारणात 1995 मध्ये श्री.अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली भाजपा सरकार सत्ता रूढ झाले. विरोधी पक्षांनी टीका केवळ व्यक्ती केंद्रित व पक्षकेंद्रित मोठ्या प्रमाणावर करण्यास सुरूवात केली. चांगली कामे दूर्लक्षित करू लागली. तेव्हा श्री. अटलबिहारी वाजपेयी यांनी असे म्हटले, 'राजकारण्यांनी राजकीय अस्पृश्यता बाळगू नये' म्हणजेच राजकीय अस्वीकार्हता ही सुध्दा राजकीय अस्पृश्यता होय.

73 व्या घटनादुरूस्तीमुळे अनुसुचित जाती–जमाती व महिलांना राजकीय नेतृत्वाची संधी प्राप्त झाली. या वर्गाच्या अध्यक्षतेखाली आयोजित केलेल्या ग्रामसभेच्या बैठकीत उपस्थित राहणे प्रस्थापित लोकांना अपमानास्पद, मानसन्मानास बाधक वाटते. यावरून त्यांचे नेतृत्व स्वीकारण्यास ते तयार नसतात. जेष्ट साहित्यिक श्री.बापूराव बागूल यांच्या शब्दात सांगावयाचे झाल्यास 'जात नाही ती जात.' याचा परिणाम ग्रामसभेच्या बैठकीत जनसहभाग कमी जाणवतो.

**ग्रामसभा सबलीकरणासंबंधी उपाय :**

ग्रामसभेस घटनात्मक दर्जा प्राप्त होऊन दोन दशके पूर्ण होऊन गेली. तिचा विकास प्रगल्भतेकडे होत असतांना काही उणिवा समोर आल्या आहेत. त्यावर उपाय :

**1) ग्रामसभेविशयी जनजाग्रती मोहिम :** नागरिकांमध्ये ग्रामसभेचा प्रचार – प्रसार व्हावा यासाठी जनजागृती मोहीम शासन – प्रशासन स्तरावर आयोजित करावी. यात गावपातळीवर, महाविद्यालयीन, विद्यालयीन स्तरावर कार्यशाळा, चर्चासत्रे, परिषदा, प्रदर्शन नाटक, पथनाट्य, लघुपट, दुरदर्शन आणि आकाशवाणी, चित्रकला, निबंध, वादविवाद स्पर्धा इ. आयोजन करून ग्राम – सभेचा प्रसार–प्रचार करावा.

**2) ग्रामसभा कार्यपध्दतीचे प्रशिक्षण :** नवीन संसद सदस्य, राज्यविधिमंडळ सदस्य व पंचायत राज्य संस्थेचे प्रतिनिधी यांना सभाग्रहाच्या कामकाजाविषयी माहिती करून देण्यासाठी जाणीवपूर्वक प्रशिक्षणाची सोय केली जाते. तसेच ग्रामसभेच्या सदस्यांना जाणीवपूर्वक ग्रामसभेच्या कामकाजाविषयी प्रशिक्षित करण्यात यावे.

**3) ग्रामसभा आयोजन अनिवार्य व सक्तीचे करावे :** ग्रामसभेचे आयोजन करण्याची जबाबदारी प्रशासकीय – राजकीय पदाधिका–यांची असते, ते कोणतेही कारण देवून ग्रामसभा आयोजनात टाळाटाळ करू नयेत यासाठी ग्रामसभा आयोजन अनिवार्य व सक्तीचे करावे. तसेच सतत तीन ग्रामसभेच्या बैठकीस अनुपस्थित राहील्यास कायमचे सदस्त्व रद्द करण्यात यावे. यामुळे ग्रामसभेस नवसंजीवनी प्राप्त होईल.

**4) ग्रामविकासाचा 'एल्गार' व्हावी ग्रामसभा :** प्रा. भालेराव संजय यांच्या मते, 'ग्रामसभा फक्त सल्लागार संस्था राहू नये तर ग्रामविकासाचा एल्गार व्हावी.' कारण ग्रामविकास कार्यक्रम व योजना आगामी

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR, All rights reserved.

अंदाजपत्रकास कागदोपत्री मान्यता देण्यापुरतीच मर्यादीत न राहता. ती अधिक व्यापक व्हावी. ज्यात गांवक–यांना स्थानिक समस्या व प्रश्न उपस्थित करून त्यांची सोडवणूक करता आली पाहिजे.

**5) ग्रामपंचायतीचे कार्यक्षेत्र मर्यादीत असावे :** ग्रामसभा यशस्वी होण्यासाठी, 'गाव तेथे ग्रामसभा' या तत्वांचा अवलंब केला पाहिजे. कारण गटपंचायतीमुळे ज्या मर्यादा पडतात त्या कमी होतील. आपल्या गावातील ग्रामसभे समोर आपल्या ग्रामविकासासंदर्भात निर्भीडपणे मांडण्यास सुरूवात होईल.

**6) अनुसूचित जाती जमाती व महिला नेतृत्वास प्रोत्साहन :** भारतीय लोकशाही 2023 मध्ये हीरक महोत्सव साजरा करण्याकडे वाटचाल करीत आहे. परंतु स्थानिक पातळीवर 'राजकीय अस्पृश्यता' बाळगणे हे अशोभनीय आहे. राष्ट्राच्या विकासात समाजातील सर्वच घटकाचा सहभाग असल्याशिवाय राष्ट्र महासत्ताक होणार नाही. याची जाणिव सगळ्याच घटकांनी ठेवली पाहिजे. राष्ट्राचा विकास सर्वांगीण व सर्व व्यापक होण्यासाठी घटनात्मक दृष्टीने अनूसूचित जाती – जमाती व महिला नेतृत्वाचा स्विकार करून त्यास प्रोत्साहन देणे आवश्यक आहे.

**7) ग्रामसभेचे निरीक्षण, मूल्यमापन व लिखित वृत्तांत :** ग्रामसभेच्या कामाचे अचुक निरीक्षण व मूल्यमापन करण्यासाठी कुशल प्रशासकीय अधिका–यांची नेमणूक करण्यात यावी. ज्यामुळे ग्रामसभेच्या बैठकीत ग्रामविकासासंदर्भात कोणत्या कार्यांना प्राथमिकता आणि मान्यता देण्यात आली, याचा लाभ ग्रामसभेच्या पुढील कार्याचा आढावा घेतांना लिखीत वृत्तांत मार्गदर्शक ठरतो.

**8) ग्रामसभेकडे व्यापक दृष्टीकोनातून पाहावे :** जागतिकीकरणामुळे 'जग खेडे झाले आहे' परंतु खेड्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला नाही. ग्रामसभा केवळ चर्चा करण्याचे ठिकाण व्यासपीठ नसून, गावांचा चेहरा – मोहरा बदलण्याचे व्यासपीठ आहे. या दृष्टीकोनातून पाहावे.

**9) मानधनाची सोय :** ग्रामसभेस उपस्थित राहणा–या सदस्यांना लोकसभा, राज्यसभा व राज्य विधिमंडळांच्या सदस्याप्रमाणे मानधन देण्यात यावे.

थोडक्यात, वरील उपायांचा विचार केल्यास ग्रामसभा सबल होण्यास चालना मिळेल.

'गाव करील ते राव काय करेल' अशी लोकोक्ती ऐकावयाची. त्यांची प्रचीती ग्रामसभेच्या माध्यमातून येण्यास प्रारंभ झाली आहे. ग्रामसभा हे एकमेव असे माध्यम आहे. जे ग्रामस्तरावर प्रत्यक्ष लोकशाही सुनिश्चित करत आहे. कारण महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अधिनियम – 2005 मधील 16(1) व 16(3) तरतूदीनूसार सामाजिक अंकेक्षणाची जबाबदारी ग्रामसभेवर सोपवून अधिक लोकाभिमुख करण्याचा व सशक्त बनवण्याचा प्रयत्न शासन प्रशासन स्तरावर होत आहे, ही बाब स्वागतार्ह आहे.

स्वर्गीय पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी म्हटले होते की, 'यदी हमारी स्वाधीनता को जनता की आवाज की प्रतिध्वनी बनाना है तो पंचायती को जितनी अधिक शक्ती मिले, जनता के लिए उतना ही लाभदायक है. '(मोदी, 2014) आज हे वास्तवात येत आहे असे म्हणता येईल. कारण ग्रामसभा ही स्वराज्य, ग्रामस्वराज्य

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR, All rights reserved.

आणि सुशासन प्रस्थापित करण्याची माध्यम होऊ पाहत आहे. असे झाले तर समृध्द ग्राम, समृध्द भारताचे स्वप्न साकार होण्यास विलंब लागणार नाही.

ज्याप्रमाणे आंतरराष्ट्रीय स्तरावर युनोची आमसभा, राष्ट्रीय पातळीवर संसदेची लोकसभा व राज्यपातळीवर राज्यविधिमंडळाची विधानसभा या प्रमाणे स्थानिक पातळीवरील पंचायतराज व्यवस्थेची ग्रामसभा सक्षम बनविल्यास भारतास जागतिक महासत्ताक राष्ट्र बनण्यास वेळ लागणार नाही. असा आशावाद व्यक्त करण्यात वावगे ठरणार नाही.

## संदर्भग्रंथ सूची


कुमारी सोनी,(जनवरी, 2014) पंचायतीराज प्रणाली में जनसहभागिता, नई दिल्ली, कुरूक्षेत्र, अंक 03, प्रकाशन विभाग, (पृ.09)

महात्मा गांधी, (2011) माझ्या स्वप्नांचा भारत, पवनार, परंधाम प्रकाशन, (पृ.25)

कटारिया, सुरेंद्र., (फरवरी, 2011) ग्रामसभा से ग्राम संसद की ओर, नई दिल्ली, योजना, अंक 02, प्रकाशन विभाग, (पृ.16)

गोडबोले माधव, (2014) जवाहरलाल नेहरूचे नेतृत्व : एक सिंहावलोकन, पुणे, राजहंस प्रकाशन, (पृ.172)

सिंह संतोष कुमार, (जनवरी 2014) ग्रामसभाः जमीनी लोकतंत्र का सशक्त आधार, नई दिल्ली, कुरूक्षेत्र, अंक 03, प्रकाशन विभाग, (पृ.28, पृ.29)

तळवलकर गोविंद, (2011), सत्तांतर – 1947 : खंड 1, मुंबई, मौजे प्रकाशन, (पृ.35)

विनोबा, (2011) ग्रामस्वराज्य, पवनार, परंधाम प्रकाशन, (पृ.08, पृ.29)

भारत सरकार, (2002) भारताचे संविधान, नवी दिल्ली, विधि, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय, (पृ.17, पृ.95)

सांभरिया रत्नकुमार, (अक्टूबर, 2010) ग्रामसभा वर्ष, दिल्ली, कुरूक्षेत्र, अंक 12, प्रकाशन विभाग, (पृ.53)

मेथ्थू जार्ज, (फरवरी, 2011),नये दृष्टिकोण की जरूरत, नई दिल्ली, योजना, अंक 02, प्रकाशन विभाग,(पृ.13)

http://rdd.maharashtra.gov.in./1131/ग्रामसभा – व राष्ट्रीय – गौरव – ग्रामसभा – पुरस्कार आणि – गौझ 12/09/2014, (पृ.01, पृ.19)

खुटवड मारूतराव आणि अवधानी मधुकर, (1991) नवे पंचायतराज्य, मुंबई, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, (पृ. 15–17)

मोदी अनिता, (जनवरी, 2014) ग्रामीण विकास और पंचायते, नई दिल्ली, कुरूक्षेत्र, अंक 03, प्रकाशन विभाग, (पृ.10)


 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR, All rights reserved.